# प्रभुतरुण

| वर्ष ५० | अंक ८ | मुंबई | फेब्रुवारी, २०१७ | पाने ६ | किंमत रु. १ |
|---|---|---|---|---|---|

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)

**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**

**www.prabhutarun.org**

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**

*सहाय्यक संपादक:* **त्वरिता दळवी, राजेश नवलकर, भक्ती शेटचे**


*संपादकीय*

## रसभरीत

—सुहासिनी कीर्तिकर

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन नुकतेच पार पडले. म्हणजे हे ९० वे संमेलन पार पडलेच. कारण मी हा लेख लिहायला घेतलाय तो २५ जानेवारीला. तेव्हा आनंद यादवांच्यावेळी झाले तसे अगदी अध्यक्षाविना का होईना; संमेलन असे ना तसे आपले पार पडतच असते बापडे! या 'बापुड्यावाण्या' समजुतीनेच मी माझ्या लेखातील पहिले वाक्य मोठ्या आत्मविश्वासाने भविष्याचा भूतकाळ करून दिले ठोकून. पण हेही खरेच की माझ्या आणि तुम्हा सर्वांच्या सदीच्छांनी डोंबिवलीतील संमेलन 'पार पडले' हेच खरे! डोंबिवली या उपनगराचे नाव कसे पडले ठाऊक आहे? 'द्रुमवल्ली' (म्हणजे झाडेवेली) या शब्दावरून! एकेकाळी झाडेवेलींच्या हिरवेपणाने हे उपनगर बहरून गेले होते. आता? भाष्य न करणेच बरे! उगाच माणसाचा हिरवटपणा नको व्यक्त व्हायला!

तसा तो फार पूर्वीपासून विनोदी लेखनातून, विडंबनातून व्यक्त होत होता अन् आहे. अहो, त्यामुळे तर आज द्रुमवल्लींचे सानिध्य नसूनही आपले मन ताजेतवाने, हिरवेगार राहिले आहे. साहित्यातून आपल्या जीवनशैलीवर, वृत्तीवर, परिस्थितीवर भाष्य करत विडंबने वा वर्णने उभी राहिली. आपल्याला जगण्याचे संजीवन देत राहिली. अंहं, नको, नको. असं नुसतं विधानात्मक वर्णन नकोच करायला. काही उदाहरणेच पाहू त्यापेक्षा.

सध्या आर्थिक स्थितीत नवीन धोरणांच्या लटपटत्या लाटा उसळताहेत. पाचशे, हजारांच्या नोटांवर बंदी आणून नव्या करकरीत दोन हजारांच्या नोटा मध्यमवर्गीयांना बँकांतून मिळताहेत. दोन हजाराची नोट मोडायची कशी? कुठे? कशाकरिता?... प्रश्नच प्रश्न. त्यातून अडचणी. नवनवीन किस्से सांगणाऱ्या. पण अशी 'मोडीची कहाणी' आजचीच आहे का? छट्. आपल्या 'केशवकुमारां'नी म्हणजेच प्रल्हाद केशव अत्रेंनी 'झेंडूच्या फुला'तून त्यावर एक विडंबन कविताच केली आहे. पाहूया.

दे रे हरि, दोन आण्यांची मोड!
मोडीसाठी भटकुनि आले तळपायाला फोड।। धृ।।

काडि मिळेना, विडी मिळेना, इतर गोष्ट तर सोड!
मीठहि नाहीं, पीठहि नाहीं, मिळे न काही गोड!।।१।।

पैपैशाचे धंदे बसले, झाली कुतरेओढ!
'मोड नाही'चे जेथें तेथें दुकानावरी बोर्ड!।।२।।

ट्रॅम गाडितहि मोड न म्हणुनी, करितो तंगडतोड!
कुणी 'कूपने' घेउनि काढी नोटांवरती तोड!।।३।।

मोडीवांचुनि 'धर्म' थांबला, भिकारि झाले रोड!
दिडकि कशी तुज देऊं देवा, प्रश्न पडे बिनतोड!।।४।।

श्रीमंतीचे कोड पुरवुनी मोडिशी अमुची खोड!।।५।।
पाड दयाळा, खुर्द्याची रे आतां पाऊस झोड!

तर असे 'श्रीमंतीचे कोड' त्याकाळीही पुरवले जात होते म्हणायचे! अहो, म्हणूनच तर असे विडंबनलेखन अमर ठरत असते. कारण ते परिस्थितीप्रमाणेच माणसाच्या प्रवृत्तीवरही असते ना! यातून मनात एक प्रश्न सहजच तरंगत आला वरील कविता वाचून. 'भिकारी झाले रोड!' ही वस्तुस्थिती आहे का? मध्यंतरी वर्तमानपत्रात बातमी वाचलेली आठवतेय. फूटपाथवर भीक मागून जगणाऱ्या माणसाचे बेवारशी प्रेत पालिकेने उचलून त्याची विल्हेवाट लावली. हां, हां! ही 'बातमी' नव्हे. बातमी पुढेच आहे. त्या बेवारशी माणसाच्या निजत्या घोंगडीखालून ४२ लाख हाती लागले. चक्क बेचाळीस लाख! एक चुकार विचार मनात तरळला... नोटाबंदीनंतर परिस्थिती काबूत आणायला सरकारने सर्व देवालयांच्या धार्मिक ठिकाणांच्या दानपेट्यांमधील नोटांवर भिस्त ठेवली. त्याच बरोबरीने असे 'शिरीमंत' भिकारीही चाचपले असते तर? पण 'भिकारी' आणि 'श्रीमंत' हे शब्दच परस्पर अर्थविरोधी आहेत ना? (परिस्थितीविरोधी नाहीत हं!)

अशा अर्थविरोधी वागण्यातून दिसणारी माणसाची 'संस्कृती' (?) तर अनेक विनोदी लेखकांना भांडवल पुरवती झाली. फार पूर्वीपासूनच. उदाहरणच द्यायचे आहे? विनोदी कविता देणारे 'बालकराम' (म्हणजे राम गणेश गडकरी हो!) पहा; किंवा मग त्यांची 'राजसंन्यास' सारखी अपुरी नाटकेही पहा. हां! हां! मला अन् तुम्हा सगळ्यांनाच माहीत आहे की याच 'राजसंन्यास' वरून आता अलीकडे आपल्या राम गणेश गडकऱ्यांचा पुतळाच फोडून टाकला. (फोडणाऱ्या 'वीरां'ना जाहीरपणे पाच पाच लाख रुपयेही दिले गेले. ही आपली संस्कृती!!?) काय विरोधाभास पहा. या अपूर्ण असलेल्या नाटकाची १७ जानेवारी रोजी शताब्दी झाली... अन् कर्त्याचा पुतळा फोडून तोडून आपण ती साजरी केली! हा आपला कृतिशील विरोधाभासच की!... असो. तर या अपुऱ्या नाटकातील संभाजीराजांच्या चित्रणाबद्दल नाहीच मला बोलायचे, सांगायचे. सांगायचे आहे ते आपल्या प्रवृत्तीवर असलेल्या सामाजिक भाष्याविषयी, व्यंगाविषयी.

संभाजीराजांच्या काळातही सरकार दरबारी लाचलुचपत होती. कर्तृत्ववान माणसांना डावलून बुणग्यांची वर्णी लावण्याची वशिलेबाजी होती. सर्वकाळी माणसं सारखीच की हो! यात एक जीवाजी नावाचा 'कलम' बहाद्दर आहे म्हणजे कारकून. 'कारकुनी गादीचा कोपरा म्हणजे बारमहा पिकणारे पैशाचे शेत! तिथे पैसा पेरावा, कामाचे पीक घ्यावे!' ही याची नीती. 'अरे, कारकुनी कसबाला प्रेताच्या टाळूवरचे लोणी खाणारे डोके लागते!' असे म्हणत तो आपले पराक्रम सांगतो... 'थोरल्या राणीसाहेब - सईबाईसाहेब जेव्हा मेल्या - आपले वारल्या, तेव्हा तर या जीवाजीची तारीफच करायला हवी होती. खाजगी खात्यातून सवा खंडी चंदनाचा हुकूम झाला; पण सवा शेर चंदनाच्या उटीने सवा खंडी बाभळीचे चैत्री हळदीकुंकू आटोपले आणि पंधरा मोहोरांची बचत केली! गडावर धूम बोलवा, की सवा खंडी चंदनाने मातोश्रींना मुक्ती दिली म्हणून; पण खरी गोष्ट एक देवाला ठाऊक; त्या जळत्या जीवाला ठाऊक; की एक या जीवाजीला ठाऊक!' व्वा! पंधरा मोहरांची जीवाजीची बचत. वडिलांच्या मृत्यूवेळीही हा जीवाजी अस्सेच वागतो. आपला 'कलमबोध'

(कलम म्हणजे लेखणी. त्याचेही अनेक पराक्रम या संवादात आहेतच.) ऐकवतो.

ही 'टाळूवरचे लोणी' खाण्याची पद्धत आता तर अवतीभोवती बोकाळली आहे. राजकारण, समाजकारण, अर्थकारण, धर्मकारण... काही म्हणता काही सुटत नाही यातून. मग सैनिकांना निकृष्ट अन्न दिले जाते, आश्रमशाळांतील मुलांच्या सुविधा स्वत:चे घर भरण्यासाठी 'सुविद्य' पणे वापरल्या जातात, मतदान जवळ आले की ('निवडणुका' नव्हेत; कारण आपण कोण' उडदामाजि काळे गोरे' निवडणार?)

वाढदिवस - हळदीकुंकू - सहली - मैफली आयोजित करून भेटी दिल्या जातात.

'यंव करू अन् त्यंव करू'... अशा आश्वासनांची लाच दिली जाते, पुस्तकातील आदर्श पाठावर लाल फुल्या मारल्या जातात, न पेलणारी सामाजिक कामे गाजावाजा करून सुरू केली जातात. अन् किती किती, काय काय! गंमत म्हणजे आपण, स्वत:ही त्यात कळत नकळत सामील असतो. 'सहनाववतु, सहनौभुनक्तु' चालूच असते आपले.

तरीही कधीतरी, कुठेतरी

(पान २ कॉलम १ वर)

संपादकीय

(पान १ कॉलम २ वरून)

तत्त्वाच्या नावाखाली पुस्तकांवर, लेखकांवर गदा आली, जाळपोळ झाली, नासधूस झाली तर आत आत... अगदी मनातल्या तळघरात एक विषण्ण करणारा ओरखडा उमटतो. नशीब! अजूनही आपले मन संवेदनशील, सज्जन आहे! 'हृदयाच्या अंतर्हृदयी' येणारी उदासीनता मग एखाद्या कवीच्या शब्दात प्रखर वास्तव मांडते. फक्त मांडते. त्याचा धिक्कार करीत नाही! प्रफुल्ल शिलेदार या आजच्या कवीची एक कविता आहे -

पुस्तकं निशस्त्र असतात
मात्र पुस्तकांवर
हल्ले होण्याचा इतिहास
जुनाच
पुस्तकं
लेखकाला
दहशतीचं ओझं देऊन
परागंदा करतात - (अरुंधती रॉय, तस्लीमा आठवा! -इति मी!)
आयुष्यभराकरता
मायभूमीतूनच
हद्दपार करतात
लेखकाचं मुंडकं
छाटून आणणाऱ्यास
बक्षीस ठेवतात
पुस्तकं
पिसाटतात
टराटरा फाडली जातात
पिसेपणातही
फार संयम ठेवून
पुस्तकंच कधीकधी
लेखकाच्या ऐवजी
जाळली जातात

विद्याधर पुंडलिकांची सावरकर पत्नीवर लिहीलेली 'सती' कथा अशीच जाळली गेली होती. 'सती' झाली होती. असो. आपल्या सत्प्रवृत्तींवर सती जाण्याची वेळ न येवो. 'अक्षरांचा दिवा' तेवत राहो. (साहित्य संमेलने यशस्वी होवोत.)

या लेखात विनोदावरच लिहीणे झाले. तर त्याची सांगता पसायदानासारखी परभांना आवडणाऱ्या 'रसायदाना'नेच करूयात. (अर्थात् हे 'रसायदान' मला 'व्हॉटस्‌ॲप'वरून दिले गेले आहे.)

**रसायदान**

आता मत्स्यात्मके देवे। येणे खाद्ययज्ञे तोषावे।

चोखोनी मज द्यावे। रसायदान हे।।

जो कर्लीचा काटा चुकवो। तया मासळी रोजी पावो।

कोळिणी परस्पर भांडो। गिऱ्हाईकांसाठी।।

बोंबिल रोजी मिळो। चिंबोरी स्वधर्म नांगी मारो।

जो जे वांछील तो ते खाओ। मत्स्यजात।।

वर्षतु सर्वत्र मासळी। सत्वर रेसिपी मांदेली।

अनवरत मालवणी। भेट तू मसाला।

चला पाहुया बाजार। ताज्या माशांचे आगर।

फडफडते डोंगर। झिंग्याचिए।।

हलवे जे अलांच्छन। बांगडे जे पाकहीन।

ते सदाही सर्वभक्षण। सुर्मयी हेतू।।

किंबहुना पापलेट। फ्राय करावा रसलिप्त।

भोजनी अखंडित। असो द्यावे।।

आणि सुकी मासळी। हंगामात पावसाळी।

डब्यातून थोडीथोडी। काढावी जी।।

येथ म्हणे श्रीमच्छिन्द्रावो। भूतमात्र आकंठ खावो।

भरपेट आडवा होवो। समाधिस्तसा।।

*

# बेझिक (BEZIQUE)

**-श्री. दीपक माधवराव धैर्यवान**

नोव्हेंबर २०१५ या महिन्याच्या २० तारखेला 'पाठारे प्रभु सोशल समाज' आणि 'हौशी कला मंदिर' या दोन संस्थांनी मिळून बेझिक या पाठारे प्रभुंच्या खास खेळाचे व कॅरम स्पर्धांचे आयोजन केले होते.

कॅरम स्पर्धेला अपेक्षेप्रमाणे छान प्रतिसाद मिळाला. परंतु बेझिक स्पर्धेकरिता केवळ तीन पाठारे प्रभु खेळाडूंव्यतिरिक्त इतर कोणीही सहभागी होण्यास तयारी दर्शविली नाही. असे असूनही या दोन ज्ञाती संस्थांच्या पदाधिकाऱ्यांनी जिद्दीने 'एक बेझिकचा प्रदर्शनीय सामना का होईना; पण आपण खेळूया' असे ठरविले. मी, माझी पत्नी सौ. नीलन, श्री. अजित शंकरराव त्रिलोकेकर, सौ. नीता सेंजित, श्री. जयंत किर्तीकर व सौ. प्रतिभा सुरेंद्र विजयकर असे आम्ही सहा खेळाडू मिळून बेझिकचा डाव मांडला. सुखद आश्चर्य म्हणजे डाव सुरू होताच सभागृहात उपस्थित पाठारे प्रभु बंधुभगिनींचे कुतुहल जागृत होऊन हा खेळ कसा खेळतात हे जाणून घेण्यासाठी आमच्या टेबलाभोवती त्यांनी गर्दी केली. इतकेच नाही तर; जसजसा आमचा डाव रंगत चालला तसतसे हे सर्वजण ''आम्हाला शिकवा, आम्ही आजच दुसरा डाव खेळणार'' म्हणून आग्रह करू लागले. आम्ही देखील त्यांच्या विनंतीला मान देऊन बेझिकचा दुसरा डाव मांडला व तोदेखील आमच्या मार्गदर्शनाखाली का होईना; परंतु खूपच यशस्वी झाला व त्याचा सर्वांनीच आनंद घेतला,

या घटनेच्या अनुषंगाने एक वस्तुस्थिती मात्र उघड झाली की आपल्या अनेक पाठारे प्रभु बंधु भगिनींना बेझिक हा खेळ काय आहे, हे ठाऊक नाही. पण तो शिकून घ्यायची मनापासून इच्छा आहे! विशेष म्हणजे यात अनेक तरुण तरुणीही सामील होते.

बेझिक हा आपल्या पाठारे प्रभुंचा पिढीजात कौटुंबिक खेळ. आम्ही तर तो वर्षानुवर्षे खेळत आलो आहोत. एके काळी आपल्या पाठारे प्रभु सोशल क्लबमध्ये बेझिकच्या स्पर्धा भरविल्या जात व त्यांना भरघोस प्रतिसादही मिळत असे. ज्या सोशल क्लबमध्ये तरुण तरुणी कॅरम, टेबल टेनिस, बिलीयर्ड खेळण्याकरिता येत तेथेच प्रौढ मंडळी बेझिकचा डाव नियमीत मांडत असत व त्याचा मनमुराद आनंदही घेत असत.

कालांतराने काही कारणांनी का होईना; पण हा आपला पिढीजात खेळ हळूहळू विस्मृतीत जाऊ लागला व पर्यायाने आपली तरुण पिढी या खेळाच्या जाणकारी व आनंदापासून वंचित राहिली.

''बेझिक म्हणजे काय? तो कसा खेळतात? आम्हाला शिकवाल का?'' असे प्रश्न त्या दिवशी काही प्रौढ व विशेषतः तरुण मंडळींकडून विचारण्यात आले. हा त्यांचा पवित्रा आमचा उत्साह वाढविणाराच होता. आम्ही मनोमन सुखावलो. साहजिकच मनात आले की 'बेझिक' कसा खेळतात हे सांगण्याचा आपल्यापरीने का होईना; पण प्रयत्न करूया.

इंटरनेटवर पाहिले तर 'बेझिक' या पत्त्याच्या खेळाचे नियम व पद्धती वेगवेगळ्या आहेत. परंतु हा खेळ आपण पाठारे प्रभु कसा खेळत आलो आहोत ते सांगण्याचा मी इथे प्रयत्न करतो.

बेझिक दोन, चार, सहा किंवा आठ खेळाडूंमध्ये खेळता येतो. म्हणजे थोडक्यात एक विरुद्ध एक, दोन विरुद्ध दोन, तीन विरुद्ध तीन आणि चार विरुद्ध चार अशा खेळाडूंच्या प्रतिस्पर्धी संघात किंवा संचात खेळला जातो.

आठ, दहा किंवा १२ पत्त्यांचे जोड ज्यामध्ये ५२ पत्त्यांपैकी फक्त एक्क्यापासून सत्तीपर्यंतच पाने घेतली जातात. समजा, पत्त्यांचे आठ जोड खेळण्यासाठी घेतले तर एकूण पाने २५६ खेळण्यासाठी घेतली जातात. तसेच १० किंवा १२ पत्त्यांचे जोड घेतले तर अनुक्रमे ३२० आणि ३८४ पाने खेळण्यासाठी घेतली जातात. ६ (सही) ते २ (दुर्री किंवा दुक्की) पर्यंतची पाने वगळली जातात.

खेळ सुरू करताना सर्व पत्ते नीट पिसून झाल्यावर प्रत्येक खेळाडूला दहा, बारा किंवा सोळा पाने वाटली जातात. उरलेली सर्व पाने मधोमध एकावर एक अशी ढीग बनवून ठेवली जातात. काही मंडळी प्रत्येक जोडीतील अठ्ठी (८) व नववी (९) अशी ८ ते १० पाने या ढिगाऱ्याखाली ठेवतात जेणेकरून डाव संपता संपता कोणतेही महत्त्वाचे पान किंवा पाने शेवटच्या १० ते १२ पानांत राहून कोणत्याही संघाचे गुण काढायची संधी वाया जाऊ नये. सर्वांना पाने वाटून झाल्यानंतर पत्ते वाटणारा खेळाडू उरलेल्या पानांच्या राशीतून कोणतेही पान काढून सुलट करून दाखवितो. हाच रंग हुकूम म्हणून धरला जातो. म्हणजे थोडक्यात बदामचे कोणतेही पान निघाले तर बदाम हुकूम, तसेच इसपिक, चौकट व त्रिफूल (किंवा फ्लॉवर) याप्रमाणे हुकूम धरला जातो.

बेझिक गुणांकानुसार कोणत्याही प्रकारातील एक्का, राजा, राणी, गुलाम व दश्शी (१०) ही पाने महत्त्वाची असतात. पण त्यातही महत्त्वाचे म्हणजे एक्क्यानंतर दश्शीचा मान मोठा. प्रतिस्पर्ध्यांच्या राजा, राणी, किंवा गुलामवर त्याच रंगाच्या किंवा हुकुमाच्याही दश्शीने मात करून तो विशिष्ट हात जिंकता येतो.

बेझिकचा डाव सुरू करताना पाने वाटणाऱ्याने जे पान सुलट केले ते जर सत्ती निघाली तर हुकूम तर झालाच पण या हुकूमाच्या सत्तीचे १० गुण साहजिकच त्याच्या संघाला मिळतात व डाव सुरू झाला असे मानले जाते. डाव सुरू करताना पाने वाटणाऱ्याच्या पुढील म्हणजे उजवीकडील खेळाडूने खेळायला सुरुवात करायची असते. कोणत्याही संघाने हात घेतल्यानंतर प्रथम सत्ती (हुकुमाची) सुलट दाखवून १० गुण वसूल करायचे. हे हुकुमाच्या सत्तीचे १० गुण कोणत्याही संघाने घेतल्याशिवाय बेझिक डाव सुरू करता येत नाही म्हणजे गुण काढायला सुरुवात करता येत नाही हे महत्त्वाचे.

**बेझिकचे गुण (MARKS) मोजण्याची पद्धत कशी असते?..**

ही गुणपद्धती थोडक्यात सांगतो.

बदाम, इसपिक, चौकट वा त्रिफूल यापैकी कोणत्याही प्रकारातील चार एक्क्यांचे १०० गुण, चार राजांचे ८० गुण, चार राण्यांचे ६० गुण व चार गुलामांचे ४० गुण आणि हुकुमाच्या सत्तीचे १० गुण अशी गुणपद्धत असते.

हुकुमाच्या राजा-राणी या जोडीचे ४० गुण व इतर तीन प्रकारातील राजा-राणीच्या जोडीचे प्रत्येकी २० गुण धरले जातात. राजा राणीची कोणतीही जोडी दाखविल्यास ती 'उभी' अशा प्रकारे मांडून ठेवली जाते व त्यातील राजाचे किंवा राणीचे लग्न लावल्यानंतर ते 'आडवे' अशा स्वरूपात मांडून

(पान ३ कॉलम १ वर)

(पान २ कॉलम ४ वरून)

ठेवले जातात. तसेच चार राजे, चार राण्या व चार गुलाम दाखविल्यास ते 'आडवे' या स्वरूपात आपआपल्या पुढ्यात मांडून ठेवायचे असतात.

बेझिक हा सांघिक खेळ असल्याने समजा तीन विरुद्ध तीन प्रतिस्पर्धी असे मिळून सहा खेळाडू खेळत असतील तर भागीदारांपैकी एकाने कोणत्याही रंगातील चार राजे, राण्या दाखविल्या असल्यास त्याच्या इतर दोन भागीदारांपैकी कोणीही हात घेतल्यानंतर त्यातील कोणत्याही राजाचे राणी दाखवून किंवा राणीचे राजा दाखवून लग्न लावून ४० किंवा २० गुण वसूल केले जातात.

**बेझिकची जोडी म्हणजे काय; व हुकुमाचा संच म्हणजे काय?**


मघा म्हटल्याप्रमाणे पाने वाटणाऱ्याने सर्वांना पाने वाटून झाल्यानंतर उरलेल्या पानातून कोणतेही एक पान सुलट केल्यास तो रंग किवा प्रकार 'हुकूम' म्हणून मानला जातो.


उदाहरणाकरिता सांगतो की समजा, बदामचे पान सुलट झाल्यास बदाम हा 'हुकूम'! अशा वेळी इसपिकची राणी व चौकटचा गुलाम ही बेझिकची जोडी धरली जाते. त्रिफूल (किलवर) हुकूम झाल्यास हीच जोडी बेझिक म्हणून धरली जाते. मात्र इसपिक किंवा चौकट हुकूम झाल्यास त्रिफूल राणी व बदाम गुलाम ही जोडी 'बेझिक' म्हणून धरली जाते.


भागीदारांपैकी एकट्याने किंवा सांघिक पद्धतीने दाखविलेल्या पहिल्या बेझिकच्या जोडीचे ४० गुण, दुसऱ्या जोडीचे ५०० गुण, तिसरीचे ७५० गुण, चौथीचे १००० गुण. अर्थात त्यापुढेही १५००, २००० असे बेझिकचे गुण मिळविता येतात.

आता हुकुमाच्या गुणांची पद्धत पाहुया. हुकुमाच्या एक्का, राजा, राणी, गुलाम व दश्शी (१०) अशा पहिल्या संचाला २५० गुण, दुसऱ्या संचाला १००० गुण, तिसऱ्या संचाला १२५० गुण, चौथ्याला १५०० व पाचव्या संचाला २००० गुण अशी गुणांची पद्धत असते. इथेही हा सांघिक खेळ असल्याने भागीदारांपैकी समजा एकाने हुकुमाची राजा-राणी काढलेली असल्यास व त्याने किंवा दुसऱ्या भागीदाराने हुकुमाचे चार गुलाम दाखविलेले असल्यास त्यांनी स्वत: किंवा दुसऱ्या भागीदाराने केवळ हुकुमाचा एक्का व दश्शी दाखवून हा संच पूर्ण करून त्याचे गुण वसूल करता येतात. ही तर खरी या सांघिक खेळाची जमेची बाजू व गंमत!

बेझिकचे विशिष्ट 'मार्कस्' असतात. ते कसे असतात व बदाम हुकूम झाल्यास हुकुमाचा संच आणि इसपिकची राणी व चौकटचा गुलाम





ही बेझिकची जोडी असल्यास गुणपद्धत () कशी असते हे सोबतच्या चित्राच्या आधारे समजणे सोपे जाईल.

चित्रावरून 'बेझिक मार्कर' कसे असतात त्याची पूर्ण कल्पना आपणास येईल. दोन संघ खेळत असल्याने प्रत्येक डावात असे दोन मार्कर वापरले जातात.

बदाम हुकूम म्हणून गृहीत धरल्यास हुकुमाचा संच कसा असतो आणि त्यावेळी इसपिक राणी आणि चौकट गुलाम ही जोडी म्हणजे 'बेझिकची जोडी' धरली जाते. हुकुमाच्या पहिल्या संचाचे २५० गुण व पुढील प्रत्येक संचाचे १०००, १२५०, १५००, २००० असे गुण मिळतात. बेझिकच्या पहिल्या जोडीचे ४० गुण व त्यापुढील प्रत्येक जोडीचे ५००, ७५०, १०००, १२५०, १५०० आणि २००० असे गुण त्या त्या संघाला मिळतात. त्रिफुल (किलवर) हुकूम झाल्यास बेझिकची हीच जोडी असते. मात्र इसपिक किंवा चौकट हुकूम झाल्यास त्रिफुल राणी व बदाम गुलाम ही बेझिकची जोडी असते.

बेझिकचा डाव सुरू करतानाच सर्व खेळाडूंच्या संमतीने डाव ५००० गुणांचा १०,००० गुणांचा की आणखी गुणांचा खेळावयाचे हे ठरविले जाते. पूर्ण डाव जिंकणारे खेळाडू विजयी घोषित केले जातात. मग डाव अखेरच्या टप्प्यात येत येता बेझिकची खरी कसोटी लागते. म्हणजे समजा खेळत असलेल्या दोन संघांपैकी एका संघाला लक्ष्य पूर्ण करायला केवळ १०० गुण हवे आहेत. एका भागीदाराने हात जिंकून पटकन १०० गुण घेऊन जिंकण्याच्या हेतूने हुकुमाचा एक्का खेळला तर प्रतिस्पर्धी संघातील एखादा खेळाडू हुकुमाची सत्ती खेळून त्या संघाला या सत्तीचे १० गुण घेणे भाग पाडू शकतो. म्हणजे आता त्या संघाला जिंकायला हवेत ९० गुण. आली का पंचाईत! कारण बेझिकचे गुण सम संख्येतच नोंदविले जातात, विषम संख्येत नाही. अशा तऱ्हेने पुढील प्रतिस्पर्धी संघाची कोंडी करत आपल्या संघाचे गुण वाढवित नेण्याची किमया दुसऱ्या संघाकडून केली जाते. डाव ऐन रंगात येऊ लागतो. आणि केवळ १० गुणांच्या फरकाने ५००० किंवा १०,००० चे लक्ष्य पूर्ण करू न देता प्रतिस्पर्धी संघ हा डाव जिंकू शकतो. सहजसाध्य नसले तरी या खेळात अशी उदाहरणे घडलेली आहेत! तसेच डावाच्या शेवटी राहिलेल्या ४ ते ५ पानांच्या खाली असलेली डावाच्या सुरुवातीला सुलट केलेल्या हुकुमाच्या सत्तीचे दहा गुण घेणे जिंकणाऱ्या संघाला सक्तीचे असतात हे लक्षात न राहिल्याने लक्ष्यापेक्षा १० गुण अधिक होऊन जिंकणारा संघ हरूही शकतो. यालाच 'ओव्हरगेम' किंवा लक्ष्यापेक्षा अधिक गुण असे म्हटले जाते.

अर्थात् बेझिकचे नियम व खेळण्याची पद्धत ही संक्षिप्त स्वरूपात अशी असते. प्रत्यक्ष खेळ खेळताना योग्य मार्गदर्शनाखाली व्यवस्थित खेळणे अधिकच गंमतीचे व जाणकारीचे ठरेल.

तेव्हा लोकहो, 'बेझिक' खेळायला सुरूवात करा. आम्ही

(पान ५ कॉलम ३ वर)

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# सुजाण पालकत्व

-प्रणिता प्रभाकर

मातृदेवो भवः, पितृदेवो भवः, मातेची थोरवी या आणि अशा अनेक गोष्टी आपल्या मनावर लहानपणापासून बिंबवल्या गेल्या आहेत. त्यामुळे कशीही असली तरी ती आई आहे . ती जन्मदात्री आहे. त्रैलोक्याची माता आहे. हे आपल्याला उभ्या आयुष्यात न विसरण्यासारखे आहे. असो .

परंतु आता ती संकल्पना राहिलेली नाही. कारण जी मूर्तिमंत आई लेखक व कवींनी साकारली आहे ती उभ्या जगात शोधून सापडणार नाही. वात्सल्याचा जणू सागरच असणारी आई कुठे गेली? की तो सागरच आटला आणि राहिली फक्त आई ? आजची आईची संकल्पना म्हणजे जी मुलाला जन्म देते ती. बाकी मुलाचे पालन-पोषण कसेही होवो, कुणीही करो याची तिला खंत नसते. इतकेच नव्हे तर; आपल्या मुलाने महागड्या शिक्षणसंस्थेत शिकून मोठे व्हावे त्यासाठी कितीही पैसा लागला तरी हरकत नाही. त्याच्या आवडी निवडीचा विचार न करता आपले मत आपल्या मुलावर लादून बळजबरीने शिक्षण घेण्यास लावणे म्हणजे आपल्या सामाजिक प्रतिष्ठेला म्हणजेच आपल्या 'स्टेटस'ला सांभाळणे होय. भरपूर पैसा आहे म्हणून त्याला शिक्षणही त्याच कॉलेजातून घ्यायला हवे जेथे त्याच प्रतिष्ठेची मुले जातात. येथे मुलाच्या आवडीचा विचार न केल्याने मुलगा किंवा मुलगी अर्धवट शिक्षण सोडणे, घरातून पळून जाणे किंवा वाईट मार्गाला लागणे हे पर्याय निवडतात. केव्हा केव्हा आत्महत्या करण्याससुद्धा धजतात. ह्याची अनेक उदाहरणे आपल्याला वर्तमानपत्रातून वाचनात येतात.

पूर्वीपेक्षा आता आईवडिलांची जबाबदारी खूपच वाढली आहे. त्यांना मुलांचे फक्त संगोपन करून चालत नाही, तर त्यांच्या मनाचा म्हणजेच मानसिकतेचा विचार करायला हवा.

सभोवतालच्या अनेक गोष्टींचा लहानपणापासूनच त्या लहान जीवांवर परिणाम होत चाललेला असतो. त्यांना शिकवायला कोणी लागत नाही परंतु ही लहान मुले जे करतात ते योग्य की अयोग्य ह्याकडे आई वडिलांनी सतर्कतेने पाहिले पाहिजे. मुलांना नुसते हे करू नको ते करू नको असे सांगण्यापेक्षा ते का करू नये हे सांगणे जास्त सोयीस्कर आहे. कारण सोपे आहे. ही मुले कोणतीही गोष्ट न करण्यास सहजासहजी तयार होत नाहीत. त्यांना आईवडिलांकडून सकारण स्पष्टीकरणाची अपेक्षा असते. जोपर्यंत तुम्ही-आम्ही सांगितलेल्या गोष्टी त्यांना पटत नाहीत तोपर्यंत सातत्याने त्यांच्या हातून त्या गोष्टी घडत राहाणार नाहीतर त्यांच्या प्रश्नांची सरबत्ती सुरू राहते व आपल्याला त्यांना तोंड देणे मुश्किल होऊन बसते .

ह्यावर उपाय एकच की, त्यांना त्यांच्या कलाने घेऊन गोष्टी पटवून देण्याचा प्रयत्न करणे होय. मी आई आहे किंवा मी बाबा आहे म्हणून मी सांगितलेले तू ऐकले पाहिजेस असे केल्यास मुले खूप हट्टी बनतात. त्यापेक्षा त्यांनी पाहिलेल्या कार्यक्रमाच्या आधारे किंवा खेळाद्वारे, एखाद्या घटनेद्वारे समजावून किंवा पटवून देण्याचा प्रयत्न करावा. आम्ही दोघेही नोकरी करणारे; त्यामुळे मुलाकडे लक्ष देण्यास आम्हाला वेळ नसतो, ही उणीव भरून काढण्याकरिता दररोज संध्याकाळी कामावरून घरी येताना मुलासाठी खाऊ, खेळ किंवा त्याच्या आवडीच्या गोष्टी आणून दिल्या की आपण आपल्या मुलाकडे लक्ष देतोय हा गोड गैरसमज आपल्या मनाशी करून घेतो आणि अनावधानाने मुलाला आपल्या प्रेमापासून वंचित करतो. अशा वेळेस हे मूल आईवडिलांचे आपल्याकडे लक्ष खेचण्याकरिता आततायीपणा करतो ज्याला इंग्रजीत आपण temper tantrum असे म्हणतो. सोप्या भाषेत बोलायचे झाले तर अति लाडाने मूल हट्टी होते, असे म्हटल्यास जास्त बरे.

उदाहरणार्थ...

चार-पाच वर्षांचा किशोर, दिवसभर टीव्हीसमोर बसलेला असे. आईवडील दोघेही नोकरी करणारे. घरात सांभाळ करायला बाईचं असे. क्वचितच आजीआजोबा घरी राहावयास आले तर. तेव्हा शाळेतून आल्यापासून घरात बाईशिवाय कोणीही नसल्याने, दोघेही टीव्ही पाहात बसत. त्यामुळे किशोरला वेगवेगळे कार्यक्रम पाहून बऱ्याच गोष्टी समजत व संध्याकाळी आई-बाबा आले, की त्याची प्रश्नमंजुषा सुरू होई. त्याला वाटे की आपण विचारलेल्या सर्व प्रश्नांची आई-बाबांकडून उत्तरे मिळतील. परंतु बहुधा त्याचा अपेक्षाभंग होत असे. एकतर त्याला चौदावे रत्न मिळत असे; नाहीतर 'तू लहान आहेस, तुला काय करायच्या आहेत ह्या गोष्टी विचारून? मुकाट्याने खेळत बस. मी सांगते किंवा सांगतो ते ऐक नाही तर मार खा.' असे होण्याचे कारण एकच, की, नोकरीवरून आल्यानंतर किशोरच्या आईवडिलांना शांतता हवी असायची. उलट आईबाबा घरी आल्यावर त्याला आनंद वाटे व उत्साहाने किशोरची प्रश्नावली सुरू व्हावयाची. हे सर्व त्याच्या आईबाबांना नकोसे वाटे व प्रसंगाला तोंड देणे मुश्किल होऊन बसे. हे सर्व टाळण्याकरिता प्रसंगी आईबाबा किशोरला मार देत व किशोर भोकाड पसरत असे. त्याला चूप राहण्यासाठी कधी चॉकलेट तर कधी बिस्कीट दे; नाहीतर खेळणी आणून देण्याचे आमिष दाखव. हे आता रोजचे झाले होते. म्हणून किशोर आपल्या मागण्या वाढवू लागला व न मिळाल्यास भोकाड पसरू लागला. अशा तऱ्हेने किशोर एक हट्टी मुलगा बनला. तो फक्त रडतच नसे; तर जे हातात येईल ते फेकत असे. प्रसंगी पै पाहुण्यांचीसुद्धा तो चाड ठेवत नसे.

ह्याकरिता लहानपणापासून मुलाशी जवळीक साधून दोघांमध्ये एक अतूट नाते निर्माण करणे आवश्यक आहे. एकमेकांवर गाढ विश्वास निर्माण करणे हे अति महत्त्वाचे आहे. ह्या विश्वासरूपी प्रेमाच्या धाग्याचे जाळे इतके घट्ट विणीचे असते की, जरी ब्रह्मदेव वरून खाली आला तरी ते तुटू शकणार नाही. ज्याप्रमाणे दररोज संध्याकाळी मुलाला शाळेत काय घडले ते विचारतो तसेच आपल्या ऑफिसातल्या गंमतीजमती त्याला सांगितल्या तर त्याच्याही मनात आपल्याबद्दल प्रेमादर निर्माण होतो. मोठ्यांच्या आयुष्यात लहानांनाही स्थान आहे ह्याची खातरजमा होते.

मुले कितीही मोठी झाली तरी आईवडिलांना ती नेहमीच लहान वाटतात. मग सोयीनुसार कधी 'अजून लहान आहेस, तुला कळणार नाही' तर कधी. 'आता तू मोठा झालास असे वागून चालणार नाही, किंवा काय पोरकटपणा चाललाय तुझा?' असे संभ्रमात टाकणारे संवाद मुलांच्या कानावर पडले की, मुलांनाच कळत नाही की, आपण नक्की कोणत्या अवस्थेत आहोत? त्यांना प्रत्येक अवस्थेची किंवा त्यांच्यातील स्थित्यंतरांची जाणीव करून देणे हे पालकांचे काम आहे. त्यामुळे मुले मोठी झाल्यावर पालकांच्यात व मुलांमध्ये मैत्रीचे नाते तयार होऊन कोणत्याही विषयावर बोलताना मुलांना किंवा पालकांना मोकळेपणा वाटतो.

प्रत्येक अवस्थेत किंवा स्थित्यंतरात माणसाला अनेक अनुभव येत असतात व हे अनुभव घेऊन बऱ्यावाईटाचा परामर्श करावा लागतो. पौगंडावस्था ही माणसाच्या आयुष्यातील अशीच एक अवस्था आहे की, ज्याचा प्रत्येकाला अनुभव घेऊन त्यातील चांगल्या व वाईट गोष्टींचा परामर्श घ्यावा लागतो. याकरीता सुरवातीला आईवडिलांच्या साथीची खूपच जरूरी असते. पौगंडावस्था ही खऱ्या अर्थाने आयुष्यातील चढउताराची पहिली पायरी असते. दररोज नवनवे अनुभव घ्यावयास मिळतात.ते चांगले की वाईट हे कळत नसते, अशा वेळेस आई- वडिलांची साथ जर असेल तर मुलाला भक्कम आधार मिळतो. त्यामुळे प्रत्येक वेळेस तो बाहेरच्या जगाकडे धाव न घेता आपल्या घरकुलाच्या मायेच्या ओढीने धावत येतो व वाईट अनुभवांचा मुकाबला करण्यास त्याच्यात शंभर हत्तीचे बळ प्राप्त झालेले असते ते केवळ आईवडिलांच्या प्रेमाच्या पाठिंब्याने. मुलाने किंवा मुलीने पौगंडावस्थेत पदार्पण करण्याआधी आईने मुलीला व वडिलांनी मुलाला विश्वासात घेऊन वेळोवेळी पौगंडावस्थेची प्राथमिक माहिती देऊन तयार करणे अति महत्त्वाचे असते.त्यामुळे त्याला बाहेरील गोष्टींकडे धाव घेण्याची जरुरी पडत नाही. इतकेच नव्हे तर त्याच्यातील किंवा तिच्यातील आत्मविश्वास बळावतो. त्याने वेळोवेळी विचारलेल्या प्रश्नांची व्यवस्थित उत्तरे देणे दोघांच्याही दृष्टीने हितावह असते. मुलाचे किंवा मुलीचे व्यक्तिमत्व साकारण्याची हीच वेळ असते. त्यांना मायेच्या पदराखाली न ठेवता एक व्यक्ती म्हणून जगू द्या. त्यांचे विचार प्रकट करण्याची त्यांना संधी द्या. विचार योग्य की अयोग्य हे नीट समजवून सांगा. चांगल्या विचारांना शाबासकीची पुष्टी द्या. त्यामुळे आत्मविश्वास बळावतो.

समजा, ह्या मुलांना मोठे झाल्याची जाणीव करून दिली नाही किंवा त्यांना वेळोवेळी तुच्छतेने वागवले अथवा झिडकारले तर त्यांच्यात न्यूनगंड बळावण्याची शक्यता असते. प्रौढपणी ते दुबळे बनतात व सतत त्यांना आधाराची आवश्यकता लागते. प्रत्येकाला काही आईवडील आयुष्यभर पुरत नसतात. त्यांना आपल्या पायावर उभे राहण्यास शिकविले पाहिजे. नाहीतर त्यांचा ह्या जगात निभाव लागणे कठीण.

उदाहरणार्थ ...

एक त्रिकोणी कुटुंब; त्यात दोघेही आईवडील शिकलेले; वडील चांगल्या कंपनीत मोठ्या हुद्यावर; आई मात्र सुगृहिणी. तशी पूर्वी ती नोकरी करीत असे; परंतु लग्नानंतर घर-संसार सांभाळण्यासाठी नोकरीचा राजीनामा दिला. कालांतराने त्या दोघांना एक अपत्य झाले. त्याची जोपासना ती गृहिणी मनोभावे करू लागली. परंतु त्या गृहस्थाची तिला काही साथ मिळाली

(पान ५ कॉलम ३ वर)

# प्रकाशातील परभू
# रेणुका धुरंधर



पा. प्र. महिला समाजाने या वर्षाकरिता ज्ञाती आणि ज्ञातीबाहेरील समाजसेवेसाठी दिल्या जाणाऱ्या रौप्यपदकासाठी श्रीमती रेणूका धुरंधर यांची निवड केली आहे. केशव सुंदरराव सेंजित आणि शामराव वसंतराव कोठारे यांची सुकन्या असलेल्या रेणूकाताई दावर्स कॉलेजच्या कॉमर्स डिप्लोमाधारक आहेत. कथ्थक नृत्याचे त्यांनी रीतसर शिक्षण प्राप्त केले आहे. आपल्या मातापित्यांमध्ये असलेल्या सेवावृत्तीचा त्यांना वारसा लाभला आहे. पंचवार्षिक योजना प्रत्येक राज्यात राबविण्यासाठी नेहरूंनी 'भारत सेवक समाज' स्थापन केला. यात रेणूका 'अकाऊंटंट' म्हणून रुजू झाल्या. सध्या त्या 'जॉईंट सेक्रेटरी' या पदावर गेली ४२ वर्षे कार्यरत आहेत. दोन वर्षांकरिता त्यांची स्पेशल एक्झिक्युटीव्ह मॅजिस्ट्रेट म्हणूनही महाराष्ट्र शासनातर्फे नेमणूक झाली. आपल्या कार्यान्तर्गत त्या को. ऑप. क्रेडिट सोसायटीत कार्यवाह, इंटरनॅशनल स्टडी ॲण्ड एक्सचेंज (भारत) याच्या कार्यालय सचिव, भारत युवक समाज (मुंबई)च्या खजिनदार आणि 'महिला हितवर्धिनी' (महाराष्ट्र) च्या कार्यवाह आहेत. अनेक चर्चासत्रे आणि 'ट्रेनिंग कॅम्प' यांचे त्यांनी आयोजन केले आहे, त्यात त्यांचा सहभागही आहे.

आपल्या ज्ञातीतील सोशल समाजाच्या ३ वर्षे खजिनदार, महिला समाजात १५ वर्षे शिवणवर्ग जमाखर्च त्या सांभाळतात. चॅरिटी कमिशनरकडे 'चेंज रिपोर्ट' आदी कामे त्या सांभाळतात. पा. प्र. सोशल क्लबचे हिशेब करण्यातही त्यांची मदत झाली आहे. समाजकार्यातील सकारात्मक उर्जा त्या सतत मिळवीत असतात. त्यांचा खास परिचय म्हणजे आमचे व्यंगचित्रकार श्री. प्रदीप कोठारे हे त्यांचे धाकटे बंधू होत. प्रभुतरुणातर्फे त्यांना शुभेच्छा!

## पाठारे प्रभु महिला समाज

गेल्या अंकात आनंद मेळाव्याचे सविस्तर वर्णन पुढील अंकात देण्याचे आश्वासन दिले होते. तुम्ही स्वत: या मेळाव्याचा अनुभव घेतला असेल. परत एकदा थोडक्यात उजळणी... या मेळाव्याचे उद्घाटक होते ॲड आशिष शेलार. आपला महिला समाज एकशे दोन वर्षांचा. मुंबईतील आद्य समाजाचे शेलार यांनी कौतुक केले. 'कॅशलेस' व्यवहाराचा आग्रह धरला. सर्वांनीच असा व्यवहार करण्याचे आवाहन केले. त्यांच्याबरोबर होत्या उपमहापौर अलका केरकर. खार-सांताक्रूझ या परिसरातच त्यांचे आयुष्य गेल्याने पाठारे प्रभु ज्ञातीविषयी त्यांना आत्मीयता असल्याचे त्यांनी नमूद केले. या दोन पाहुण्यांनी महिला समाजाला रु. १०,०००/-ची देणगी दिली. डॉ. सुरैना राणे-मल्होत्रा यांनीही ५५००/-ची देणगी समाजास दिली. या मेळाव्यात परभू खाद्यपदार्थांचे तब्बल पन्नास गाळे होते. खिम्याची कवटे, कोलंबीचे पातवड, पंगोजी, गोळीच्याचे कबाब, भानवलं, मुंबरं, शेवंड्या-चिंबोऱ्या, मटण-चिकन-तिसऱ्या-कोलंबी आदींची लोणची आदी रसनेला तृप्त करणारे पदार्थ यांची रेलचेल होती. पारसी खाण्याचाही विशेष गाळा होता. शौनक जयकर या तरुणाने स्वत: मेहनत घेऊन केलेले घेवर स्टॉलवर ठेवले होते; तर जयेश कोठारेंच्या स्टॉलवर त्यांच्या 'फार्म'मधील आंब्याचा रस जीभेला आकर्षित करीत होता. याशिवाय या मेळाव्यात अमिता कोठारे-राजपूरकर यांनी केलेली केकची खास कसबी साडी बनवून त्यावर आयसिंगने वाळी, खेळणं, जाळीच्या बांगड्या आदींची कलाकुसर होती. केकच्या कसबी साडीबरोबरच या मेळाव्यात दिप्ती अंबरीष विजयकरांचा कसबी साड्यांचा गाळा होता. त्यात मांडलेल्या प्रदर्शनीय साड्यांमुळे अनेकांनी आपल्या मागण्या तिथल्यातिथे नोंदवल्या. कारण कसबी पंजाबीचेही त्यात कसब होते.

पा. प्र. महिला समाजाची सहल २०, २१, २२ जानेवारी २०१७ रोजी श्रीवर्धन, हरिहरेश्वर, दिवेआगार येथे आनंदाची लयलूट करीत गेली होती. दिवेआगारचा सोन्याचा गणपती, हरिहरेश्वर येथील काळभैरव, शंकराच्या जटांचे मंदिर त्यांनी पाहिले. कोकण म्हणजे

(पान ६ कॉलम ३ वर)

(पान ४ कॉलम ४ वरून)

नाही. तिला नोकरी सोडण्यास भाग पाडले. इतकेच नव्हे तर तिच्या आचरणावरसुद्धा संशय घेण्यास तो मागे राहिला नाही. मुलगा लहान असल्याने तिने एका भारतीय वंशाच्या स्त्रीची भूमिका पार पाडली (सहनशीलतेची). तिची कल्पना होती की, मुलगा मोठा होतोय तशी त्याच्या वडिलांच्या वागण्यात काही सुधारणा होईल. परंतु तसे न होता मुलाचा ˆवडील नेहमी तिरस्कार करीत. वेळोवेळी त्याला घालून पाडून बोलत. इतर मुलांशी तुलना करून तो कसा कमी पडतोय ते दाखवून देत. आई शिकलेली व हुशार असूनही नवऱ्यापुढे तिचे काही चालत नसे. कारण संशयाचे भूत त्याच्या मानगुटीवर बसले होते. फक्त बायकोवरच नाही तर मुलावरही संशय घेण्यास त्याने कधी मागेपुढे पाहिले नाही.

परिणामी मुलगा वयात येत गेला; तसतसा त्याचा न्यूनगंड बळावत गेला व पदोपदी वडिलांकडून होणारी मानहानी सहन न होऊन दोनतीन वेळा आत्महत्या करण्याचा प्रयत्न केला. बऱ्याच वर्षांनंतर असे उघडकीस आले (अर्थात हे त्या मुलाच्या आईने सांगितले) की, तो गृहस्थ मानसिक रुग्ण होता व लग्न झाल्यावर तो सुधारेल ह्या हेतूने त्याचे लग्न लावून दिले. पर्यायाने दोन जीवांचा खेळ झाला-एक बायको व दुसरा मुलगा.

हे समजल्यानंतर सल्लागाराने बायकोला घटस्फोट घेण्यास सांगितले व तसे मान्य नसल्यास, मुलाच्या भवितव्यासाठी त्या व्यक्तीपासून काही वर्षे अलिप्त राहण्यास सांगितले. ते मान्य झाल्याने ती आपल्या मुलाला घेऊन नाशिकला आजोबांच्या (म्हणजे तिच्या वडिलांच्या) घरी राहावयास गेली. परंतु हे तिने आपल्या नवऱ्याला कळू दिले नाही.

आता मुलगा मोठा होऊन तो बीकॉमच्या शेवटच्या वर्षाला आहे आणि त्याने 'ट्रॅव्हल अँड टूरिझम ' विषय निवडलेला आहे.

उदाहरण २

एका सुशिक्षित चौकोनी कुटुंबात; आईवडील दोघेही चांगल्या कंपनीत मोठ्या हुद्यावर. वडील तर बँकेत मॅनेजर! असे असूनही त्यांना त्यांच्या मुलाशी चांगले वागता आले नाही. वडील सतत त्यांच्या दोन अपत्यांमध्ये तर-तम भाव करीत. ते मोठ्या मुलाला नेहमी धाकट्या मुलीचे उदाहरण देत. ''ती कशी शिकतेय ते पहा, आणि तू! एवढा मोठा असून तुला शिक म्हणता शिकता येत नाही म्हणजे काय?'' असे नेहमी बोलणे असायचे. तो लहान आहे, त्याला कधी काही येणारच नाही, ही भावना त्याच्या पालकांच्या मनात सतत रुजलेली असे. त्याच्या पालकांशी बोलताना नेहमी हेच अनुभवण्यास येत असे. म्हणजे आमची मुलगी हुशार आहे. तिच्यापुढे मुलगा काहीच नाही.

ह्या सर्वांचा त्या मुलाच्या मनावर इतका परिणाम झाला की, त्याचा स्वत:वर विश्वास राहिला नाही. सतत नाकर्तेपणाची भावना त्याला डिवचत असे. एके दिवशी तो समुपदेशकाशी बोलत असताना त्याने त्याची बोटे टेबलावर ठेवली होती. नखांचा गुलाबी रंग बघून समुपदेशकाने त्याचे कौतुक केले. तेव्हा त्याने जबाबात सांगितले की, ''मॅडम तुमच्या साडीचा गुलाबी रंग माझ्या नखांवर उतरला आहे उन्हाच्या तिरिपेने.'' हे ऐकून समुपदेशक अचंबित तर झालीच; परंतु आत्मविश्वास गमावलेला व अतीव न्यूनगंडाची भावना बळावल्याचे उदाहरणच काय; परंतु अनुभवच आला.

तेव्हा आईवडिलांनी मुलांना आयुष्यभर पाळण्यातले न समजता त्यांच्या वयाचा विचार करून त्याप्रमाणे वागले असता आईवडील का समाधानी होऊ शकणार नाहीत? म्हणजेच मुलांच्या शिक्षणासाठी आणि भवितव्यासाठी आईवडिलांनी आपले आयुष्य खर्च करणे ही आयुष्यातील सर्वात मोठी गुंतवणूक आहे आणि त्याचा मोबदला खचितच मुलांच्या आयुष्याचे सोने होणे ह्यात आहे.नक्की विचार करा!!!

*

## पाठारे प्रभु चॅरिटीज

दरवर्षीप्रमाणे या संस्थेचे 'न्यूज लेटर' हे कालिक प्रसिद्ध झाले. त्यात विद्यार्थी गुणगौरव, दिवाळी संमेलन, माहेश्वरी देवीचा उत्सव, देणग्या गोळा करणाऱ्यांचा तपशील आदी सचित्र माहिती आहे. सॉलिसिटर श्री. रघुवीर दिलीप कोठारे यांची साजरा झालेली नव्वदी अगदी पहिल्याच पृष्ठावर असून त्यात यथोचित मानपत्र आहे.

*

(पान ३ कॉलम ४ वरून)

आपणाला मार्गदर्शन करायला सदैव तत्पर आहोत. जेणेकरून आपल्या पाठारे प्रभू ज्ञातीचे खास वैशिष्ट्य व एक वेगळीच मक्तेदारी असलेला व पूर्वापार चालत आलेला हा कौटुंबिक आनंदाचा खेळ अनेक तरुण, तरुणी व लहान मुलेही आवडीने खेळू लागतील. काही कारणांनी का होईना; पण विस्मृतीत चाललेला हा खेळ पुनरुज्जीवित होईल. आपल्या ज्ञातीसाठी ही खूपच आनंदाची व समाधानाची गोष्ट असेल.

आपल्या पूर्वजांनी आपल्याला दिलेला हा अमूल्य ठेवा आपण का बरे जतन करून अधिक वृद्धिंगत करू नये?

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक
३२) कै. सौ. विजया व श्री. प्रकाश माधव नायक या त्यांच्या आईवडिलांच्या स्मृत्यर्थ उन्मेष प्रकाश नायक
३३) सौ. वृंदा आणि श्री. शाम विनायक जयकर
३४) कै. श्रीमती जयश्री आणि कै. श्री. जयवंत विश्वनाथ कीर्तिकर स्मृत्यर्थ श्री. उमेशचंद्र जयवंत कीर्तिकर
३५) कै. श्रीमती प्रतिमा आणि कै. श्री. धाकलेश्वर बाळाजी जयकर स्मृत्यर्थ सौ. सुप्रिया उमेश कीर्तिकर

## प्रभुतरुणास देणगी

∗ श्रीमती कस्तुर रवीन्द्र तळपदे यांजकडून प्रभुतरुणास शुभेच्छा रु. १००१/-

∗ सौ. ज्योत्स्ना आणि रामकृष्ण तळपदे यांजकडून लग्नाच्या सुवर्ण महोत्सवानिमित्त रु. ५५०/-

∗ श्री. धनंजय अजिंक्य, श्री. उत्कर्ष अजिंक्य आणि श्री. ऋषिकेश वेलकर या नातवांच्या दैदिप्यमान यशाप्रीत्यर्थ श्री. प्रताप वेलकर यांजकडून रु. १५०/-

∗

## अभिनंदन

∗ श्री. धनंजय योगेन्द्र अजिंक्य - कमर्शियल प्लानिंग मॅनेजर, फायझर, ऑस्ट्रेलिया यांना 'ॲवार्ड ऑफ एक्सलन्स २०१६' चा बहुमान प्राप्त झाला.

∗ श्री. उत्कर्ष योगेंद्र अजिंक्य यांची सिडनी - ऑस्ट्रेलियामध्ये कमर्शियल अकाऊन्टस् कंपनीत 'प्रोफेशनल अकाऊंटन्ट' म्हणून नेमणूक झाली.

∗ श्री. ऋषिकेश तेज प्रताप वेलकर, एम. एस. यांची 'प्लान्ट मॅनेजर' म्हणून सिल्वर बक पावर प्लान्ट, 'लॉस व्हिगास' कंपनीत नेमणूक झाली.

∗ डॉ. सुमन नवलकरांची 'झिम्मड झिम्मड' (बालकविता), नि:शब्द (कादंबरी), 'वॉकिंग ऑन माय हँडस्' (इंग्रजी कविता) अशी तीन पुस्तके प्रकाशित झाली. त्यांचा 'शिवसृष्टी' आणि 'गोखले कॉलेज' येथे कथाकथनाचा कार्यक्रम झाला.

सर्वांचे अभिनंदन.

## अनुवाद-संवाद

### शुभप्रभात

ती असते प्रभात
येऊन जाते पटकन्
देतेय दुसरी संधी झटकन्
करते तुम्हाला उल्हसित
तिचे करा स्वागत.
लुटा सुर्योदयाचा आनंद
पसरते आशा ज्यातून
करते तुम्हाला प्रवृत्त
जाण्यास प्रयत्नापल्याड.
आलाय दिवस नवीन
शुभेच्छा तुम्हाला देत
नि:संकोच करा काम
अडकला आहात ज्यात;
खरोखर जीवन हे अद्भूत
मिळालेल्या संधीचे-
टाका सोने करून.
जी स्फूर्ती मिळतेय
आभार तिचे खूप-
खूप टाका मानून
आलीय प्रभात म्हणून!

(स्नेहांकिता चन्ने यांच्या कवितेचा अनुवाद)

**-कल्पना सुभाष कोठारे**

## प्रभुतरुणाची डायरी

### विवाह माणिक महोत्सव

२६-१-७७ श्री. आनंद शामराव तळपदे कु. श्रुता मधुकर कीर्तिकर

### मरण

३-१-१७ श्रीम. जान्हवी वडके (पूर्वाश्रमीच्या लीला रवीन्द्र प्रभाकर), वय ६५, दादर
७-१-१७ श्री. मोहन शामराव जयकर, वय ८६, जोगेश्वरी
१६-१-१७ श्रीम. साधना सुरेश विजयकर, वय ७६, राणेवाडी, अंधेरी
२१-१-१७ श्री. सुरेश गजानन कोठारे, वय ८७, अंधेरी (प.)

(पान ५ कॉलम २ वरून)
समुद्रसहवास. मग बोटसफर, समुद्रस्नान, तीरावरील घोडागाडीची फेरी, उंटसवारी... असा सुंदर अनुभव घेणे आलेच. शिवाय पोटापाण्याची काळजी नाही. सकाळच्या नाश्त्यापासून रात्रीच्या भोजनापर्यंत सामिष खाण्याची चंगळ होती. त्यात बहार म्हणजे रात्रीचे 'कॅम्पफायर'! ४५ महिलांनी 'फायरवर्क्स' वाटेल असे नानाविध कार्यक्रम सादर केले. कॅटवॉक, नाच, गाणी झाली. वंदनाताई नवलकरांनी लहान मुलींची सवेष नाट्यछटा सादर केली. स्वातीताई राणे यांनी कथाकथनाने कार्यक्रमात रंग भरला. या यशस्वी झालेल्या सहलीच्या आयोजनात बिंबा नायक, नीता सेंजित, साया नवलकर, पल्लवी कोठारे, शोभना जयकर यांचा सहभाग होता. अशी सहलीत सहल, महिला समाजाची सहल... त्यात रंगली आनंदाची मैफल!

∗

## परीक्षेतील सुयश

**डिप्लोमा इन आर्थोपिडिक्स (डी. ऑर्थो) मुंबई**

डॉ. अमित चंद्रशेखर धैर्यवान

## जरा हसा

एकजण मित्राला सांगत होता-
मैने किया प्यार ऐनक बदल बदलके।
यारके पिताश्रीने मारा मुझे सॅण्डल बदल बदलके।

∗

## समज पाकड्यांना

हिन्दुस्थानच्या शूर सैनिकांनो, सीमेवरच्या निधड्या जवानांनो
सलाम तुम्हा सलाम
दिवसरात्र डोळे रोखूनी या सीमांची राखण तुम्ही केलीत,
घुसखोरी करणाऱ्या शत्रूला परलोकीची यात्रा घडविलीत.
अभेद्य आहेत आमच्या सीमा, सुरक्षा जोवर तव सबल हाती
ही जनता जगे शांततेने, सोपवून कार्यभाग तुमच्या पाशी
काश्मिर, पंजाब, राजस्थान सर्वही दहशतवादी धिंगाणा घालत आहेत
पाकड्यांची लांछनास्पद कृत्ये या देशाला सतावत आहेत
रक्षण करण्या सीमांचे या भूमीचे वीरपुत्र कामी आले.
उरीमध्ये तर षंढ पाकड्यांनी मानवतेला पूर्ण गहाण ठेवले.
परि हिन्दुस्थानाने 'सर्जिकल स्ट्राईक' नामे अस्त्र जेव्हा वापरले
पाकड्यांनो, पळता पळता तुमच्या नाकी नऊ आले
लक्षात ठेवा पाकड्यांनो हा हिन्दुस्थान तुमचा बाप आहे
वळवळणाऱ्या तुमच्या शेपटांना हा देश ठेचणार आहे
मनोरथ तुमचे काश्मिर हडपण्याचे या जगी संभव नाही
धुळीस मिळवू तुम्हा आता, दया जराही शक्य नाही
कितीही शेखी तुम्ही मिरवा, शेवट तुमचा समीप आहे
आव्हान या सबल हिन्दुस्थानचे, ब्रम्हास्त्र आमुचे सज्ज आहे

**-हेमंत विनायकराव तळपदे**

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर RNI NO. 14613/67